## नियमित दिवाणी दावा क्रमांक ६१९/२०२३ मधील निशाणी क्रमांक १२ खालील आदेश

(CNR No. MHAH250019972023)

१. प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज वादीने दाखल केलेल्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने कथन केले आहे की प्रतिवादी यांना कैफीयत देणेसाठी लागणारी कागदपत्रे महसुल कार्यालयामार्फत मिळणेस उशीर झाला व त्यामुळे कैफीयत दाखल करणेस विलंब झाला आहे. प्रतिवादीची कैफीयत दाखल न झाल्यास तिचे अतोनात नुकसान होईल. सबब, कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येवुन तिची कैफीयत स्विकारण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. वादीने सदर अर्जास आक्षेप घेत कथन केले आहे की, उशीर का झाला याचे संयुक्तीक कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास हेवी कॉस्टचा आदेश व्हावा.

३. सदरचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ यांना समन्सची बजावणी दि.२६/३/२०२४ रोजी झाली असुन ते दि. २७/३/२०२४ रोजी हजर झाले आहे. तदनंतर प्रतिवादीने दि.११/७/२०२४ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. त्यांचे म्हणणे ऐकुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

### आ दे श

१. प्रतिवादी क्र. १ यांच्यावर रक्कम रु. २००/– (रक्कम रुपये दोनशे मात्र) खर्चाची रक्कम बसवुन प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने सदर खर्चाची रक्कम वादींना पुढील तारखेपर्यंत द्यावी.

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2024.08.20 16:34:19 +0530

(एन. एस. सबनीस)

दिनांकः– १७/०८/२०२४

२रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पारनेर.